नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-१८/३/२०२६

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये बुधवार दिनांक १८ मार्च २०२६ रोजी दुपारी २:५५ ( दोन वाजून पंचावन्न मिनिटे ) वाजता भरणाऱ्या माहे मार्च २०२६ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/५०५**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.४०१,दि.२२/९/२०२१
२) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.१७८,दि.४/१०/२०२४
३) भवन रचना विभागाकडील जा.क्र.८२२९,दि.२७/२/२०२६ चे पत्र.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाज विकास /१८५३,दि.५/३/२०२६ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८७३,दि.५/३/२०२६

-----

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन –

समाज विकास विभागाकडील दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणेकरिता सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रकातील समाज विकास विभागाकडील ४क, युवक कल्याणकारी योजना निधी, भवन रचना विभागाकडील शिल्लक निधीतून र.रू.१०,२०,००,०००/- ( अक्षरी र.रू.दहा कोटी वीस लाख फक्त ) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या वर्गीकरण तक्त्यानुसार उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्र.२/५०६**

**संदर्भ –** १) मा.मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका जा.क्र.४९२,दि.६/५/२०२५ रोजीची वित्तीय मान्यता.
२) मा.मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका जा.क्र.२०७५,दि.६/८/२०२५ रोजीची वित्तीय मान्यता.
३) मा.मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका जा.क्र.४५३९,दि.९/२/२०२६ रोजीची वित्तीय मान्यता.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/१८५६,दि.५/३/२०२६ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८७४,दि.५/३/२०२६

-----

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन –

पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२५-२६ चे क, अंदाजपत्रकातील भांडवली कामातील शिल्लक रकमेतून पाणीपुरवठा महसुली कामे करणेकरिता मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या वर्गीकरण तक्त्यानुसार र.रू.९२२९.०० लक्ष उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्र.३/५०७**

**संदर्भ –** १) मा.अधिक्षक अभियंता ( म.रा.वि.वि.क.) यांचे जा.क्र.SE/RAUC/TECH/HT/NO.4724, दि.२७/८/२०२१
२) मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/१२००,दि.१५/३/२०१९
३) मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/४२३,दि.८/९/२०२१
४) मा.मुख्य अभियंता ( महावितरण ) यांचे परिपत्रक क्र.C.E.(Dist )/DIII/NSC/३००११, दि.२०/१२/२०१८
५) मालमत्ता व व्यवस्थापन विभाग जा.क्र.माव्य/५०९०,दि.१७/१०/२०२२
६) शहर अभियंता कार्यालय जा.क्र.श/अ/जा/जा/१४०८५,दि.५/१२/२०२२
७) मा.उप आयुक्त (दक्षता ) कार्यालय जा.क्र.२७३७,दि.८/१२/२०२२
८) म.रा.वि.वि.कंपनी यांचे पत्र जा.क्र.अ.अ./रापेशमं/तां/९१६,दि.२२/२/२०२३

९) म.रा.वि.वि.कंपनी यांचे दि.२९/१०/२०२५ रोजीचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र.

१०) भवन रचना विभाग जा.क्र.भरका ३६५५,दि.२९/८/२०२३

११) मा.अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कंपनीचे estimate sanction no.SE/RPUC/T/HT/ DDF-1.3%BGD/2023-24/No.2829, दि.२१/५/२०२५ चे पत्र.

१२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/१९००,दि.१०/३/२०२६ चे पत्र.

१३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२३,दि.१३/३/२०२६

-----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

कात्रज स.नं.१७ येथील नियोजित संतोषनगर पंपिंग स्टेशनचे आवारात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस सब स्टेशन उभारणेकरिता पुणे महानगरपालिकेमार्फत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या नकाशा नुसार ५०८.७५ चौ.मी.जागा ३० वर्षाकरिता नाममात्र भाडे र.रू.१/- प्रतिवर्ष प्रमाणे भाडेपट्टयाने ( लीज ) हस्तांतरीत करणेस व त्याबाबतचा करारनामा करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्र.४/५०८**

**संदर्भ -** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/१९०१,दि.१०/३/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२४,दि.१३/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील भामा आसखेड जॅकवेल व २०० एमएलडी जलकेंद्र ३ वर्ष कालावधीकरिता, Comprehensive पध्दतीने चालविण्यासाठी, दैनंदिन देखभाल दुरूस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणे करिता व भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत भामा आसखेड धरण येथील जॅकवेल ते कुरूळी येथील जलशुध्दीकरण केंद्र ते लोहगाव येथील डी.वाय.पाटील कॉलेज पर्यंत टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरील सर्व व्हॉल्व्ह तसेच जलवाहिनीची तीन वर्षाकरिता देखभाल दुरूस्ती व तदनुषंगिक कामे करणे या कामाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ (ब) नुसार प्रतिवर्ष खर्चाचे दायित्व स्वीकारणेस व कलम ८९ नुसार पुणे मनपा हद्दीबाहेर असल्याने देखभाल दुरूस्ती करिता खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

१) पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील भामा आसखेड जॅकवेल व २०० एमएलडी जलकेंद्र ३ वर्ष कालावधीकरिता Comprehensive पध्दतीने चालविण्यासाठी, दैनंदिन देखभाल दुरूस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७२(ब) नुसार प्रती वर्ष र.रू.४,७५,०४,३४२.७० प्रमाणे एकूण र.रू.१४,२५,१३,०२८.१२ ( जी.एस.टी.सह अधिक किमान वेतन कायद्यानुसार विशेष भत्ता, रजा वेतन,भविष्य निर्वाह निधी, बोनस इ.वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरक इत्यादीचे दायित्व स्विकारणेस व या कामासाठी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या आर्थिक वर्षामध्ये टप्याटप्याने तरतूद करणेस.

२) भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत भामा आसखेड धरण येथील जॅकवेल ते कुरूळी येथील जलशुध्दीकरण केंद्र ते लोहगाव येथील डी.वाय.पाटील कॉलेज पर्यंत टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरील सर्व व्हॉल्व्ह तसेच जलवाहिनीची तीन वर्षाकरिता देखभाल दुरूस्ती व तदनुषंगिक कामे करणे, या कामासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७२(ब) नुसार प्रती वर्ष र.रू.३३,३२,८४०/- प्रमाणे एकूण र.रू.९९,९८,५१९/- ( जी.एस.टी.सह) चे दायित्व स्विकारणेस व सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या आर्थिक वर्षामध्ये टप्याटप्याने तरतूद करणेस.

३) भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्पांअंतर्गत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील नमूद अ.क्र.१(अ), १(ब), २(अ), २(ब) व २(क) ची कामे पुणे मनपा हद्दीबाहेर असल्याने देखभाल दुरूस्तीची जबाबदारी पुणे मनपाची असल्याने कलम ८९ नुसार सदर देखभाल दुरूस्तीच्या कामावर प्रतिवर्ष खर्च करणेस.

**विषय क्र.५/५०९**

**संदर्भ -** १) मुख्य अभियंता ( पथ ) कार्यालयाकडील जा.क्र.१३७०४,दि.२७/२/२०२५ अन्वये खात्याने सादर केलेले प्रस्तावास मा.महा.आयुक्त ठ.क्र.६/६५,दि.१६/४/२०२५ अन्वये मिळालेली मान्यता.

२) मुख्य अभियंता ( पथ ) कार्यालयाकडील जा.क्र.पथ/७६०,दि.२३/४/२०२५ रोजीचा भूसंपादन प्रस्ताव.

३) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०९,दि.१६/५/२०२५ व मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.६२, दि.२०/५/२०२५ रोजीची मान्यता.

४) कोथरूड विधानसभा मतदार संघातील वाहतूकीच्या समस्यांबाबत मा.नामदार चंद्रकांतदादा पाटील, कॅबिनेटमंत्री,उच्च आणि तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य यांचे समवेत दि.१२/७/२०२५ रोजी झालेली बैठक

५) सन २०२५-२६ मधील अंदाजपत्रकीय तरतूद
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१९०३,दि.१०/३/२०२६ चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२५,दि.१३/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पुणे पेठ कर्वेनगर शिवणे खराडी प्रकल्पा अंतर्गत राजाराम पूल ते महालक्ष्मी लॉन्स दरम्यान ३६ मी.डी.पी. रस्त्यामधील ताब्यात न आलेल्या उर्वरित जागा ताब्यात घेणेकामी भूसंपादन कार्यवाही सुरू करणे व त्यासाठी आवश्यक रक्कम पथ विभागाकडून उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.६/५१०**

**संदर्भ -** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१९०६,दि.१०/३/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२७,दि.१३/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

प्र.क्र.३६ मधील विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेकामी र.रू.२५ लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| विद्युत विभाग, सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक, बजेट कोड-CE20C352/B5-498, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक, बिबवेवाडी परिसरातील लायब्ररीमध्ये विद्युत व फायर फायटिंग विषयक कामे करणे. | २५ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे<br>विद्युत विभाग -<br>१) प्रभाग क्र.३६ मधील बिबवेवाडी गावठाण, बकुळ हॉल आसपासच्या परीसरामध्ये प्रकाश व्यवस्थेत सुधारणा कामे करणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.३६ मधील इंदिरा नगर दुर्गामाता मंदिरामध्ये ज्येष्ठ नागरिक खोली तसेच बिबवेवाडी ओटा मधील मनपा चाळ येथील विद्युत विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.३६ मधील बिबवेवाडी ओटा, पापळ वस्ती, बिबवेवाडी गावठाण,भगली हॉस्पिटल परिसर येथे विद्युत विषयक दुरूस्तीची कामे करणे. | --- | ५ लक्ष |

**विषय क्र.७/५११**

**संदर्भ -** १) मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे दि.१२/९/२०२५ रोजीचे कोंढवा खु.शिवनेरीनगर येथील जागा पाहणी.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/१९०९,दि.१०/३/२०२६ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२९,दि.१३/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

प्रभाग क्र.२७ कोंढवा खुर्द येथे ड्रेनेज लाईनमुळे विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुधारणे कामी नवीन एचडीपीई जलवितरण नलिकेचे नेटवर्क विकसित करणे या कामासाठी र.रू.४,७०,१०,८९८/- तरतूद पुणे मनपाच्या अंदाजपत्रकात पुढील दोन वर्षात ( २०२६-२७,२०२७-२८) टप्याटप्याने महाराष्ट्र महापालिक अधिनियमचे कलम ७२(ब) अन्वये उपलब्ध होणेस व त्या रकमेचे दायित्व स्वीकारणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.८/५१२**

**संदर्भ -** १) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, पुणे ( गृहशाखा ) क्र.पगस/ई-ऑ/ २१५२/०५/२०२५,दि.८/१०/२०२५ रोजीचे पत्र.
२) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.४२२,दि.२२/९/२०२१
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आपत्ती/१९१०,दि.१०/३/२०२६ चे पत्र,.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९३०,दि.१३/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मौजे खराडी,ता.हवेली, जि-पुणे येथील सर्वे नं.३७ पै.मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसाहत येथे दि.२३/४/२०२५ रोजी पहाटे ०५ वाजणेच्या सुमारास अचाक आग लागून आगीच्या दुर्घटना व नुकसान ग्रस्तांना द्यावयाच्या मदतीसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.
१) मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या संदर्भ क्र.१ नुसार मा.तहसीलदार, हवेली यांचेकडील दि.१०/६/२०२५ रोजीच्या अहवालानुसार व सदर पत्रासोबत दि.२३/४/२०२५ रोजीच्या घटनेत नुकसान झालेल्या कुटुंबाची यादीनुसार मौजे खराडी, ता.हवेली, जि.पुणे येथील सर्वे नं.३७ पै.मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसाहत येथील ९० कुटुंबाना र.रू.११,०००/- प्रमाणे एकूण र.रू.९,९०,०००/- नुकसान भरपाई करिता मदत मा.जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे, गृह शाखा यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार बाधित कुटुंबाना नुकसान भरपाई/अर्थसहाय्य वाटप करणे.
२) पुणे महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ अंदाजपत्रकातील, थ-आपत्ती व्यवस्थापन विभाग, थ.१ नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्ती प्रसंगी आपत्तीग्रस्तांना मदत व पुनर्वसन करिता व तदनुषंगिक कामांकरिता., बजेट कोड RE11R101 मान्य तरतूद र.रू.५०,००,०००/- मधून र.रू.९,९०,०००/- बाधित कुटुंबाना अर्थसहाय्य वाटप करणेस.
३) मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, गृहशाखा यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीनुसार बाधित कुटुंबाना अर्थसहाय्य म्हणून डीबीटी पध्दतीने संबंधिताच्या बँक खात्यावर रक्कम जमा करणेस.
४) उपरोक्त सदर प्रस्तावाची अंमलबजावणी उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ व महापालिका सहाय्यक आयुक्त,नगर रोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय यांचेमार्फत करणेस.

**विषय क्र.९/५१३**

**संदर्भ -** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/१९९०,दि.१७/३/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२००४,दि.१७/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभागृह नेते कार्यालय, मा.स्थायी समिती अध्यक्ष कार्यालय, मा.विरोधी पक्षनेते कार्यालय, विविध पक्षांचे गटनेता यांची कार्यालये या ठिकाणी कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ पुरविणे हे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये ठेकेदार मे.जी.आय.एस.वर्ल्ड हॉस्पीटॅलिटी सर्व्हिसेस प्रा.लि.यांचेकडून दि.१/३/२०२६ रोजी पासून ते दि.२८/२/२०२७ पर्यंत ( १ वर्षाकरिता ) मा.मुख्य कामगार अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या दरानुसार काम करून घेणेस तसेच कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मुलन ) अधिनियम १९७० कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनामध्ये वेळोवेळी होणारी वेतन वाढ आदा करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस व दि.१/३/२०२६ रोजी पासून बिल अदा करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१०/५१४**

**संदर्भ -** १) नगरसचिव कार्यालयाकडील जा.क्र.३११६,दि.२/३/२०२६
२) मा.उप आयुक्त, क्रीडा विभाग यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र.वि/१३३८,दि.४/३/२०२६
३) दि.२/३/२०२६ रोजी झालेली जागा पाहणी.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१९९९,दि.१७/३/२०२६ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०१२,दि.१७/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने दि.१०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रिडा स्पर्धासाठी लाईट,साऊंड व विद्युत विषयक कामे मे.द्वारीका लाईट अँड साऊंड, यांच्याकडून करून घेण्यास व त्यानुसार त्यांना बिल अदा करण्यास खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.
१) दि.१०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धासाठी लाईट, साऊंड व विद्युत विषय कामे मे.द्वारिका लाईट अँड साऊंड यांच्याकडून करून घेण्यास व त्यानुसार करण्यात आलेल्या तात्पुरत्या प्रकाश व विद्युत विषयक कामांची देयके खाली दिलेल्या तक्त्यानुसार.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव | कामाचे वर्णन | रक्कम रूपये जीएसटी सह |
|---|---|---|---|
| १ | मे.द्वारिका लाईट अँड साउंड | दि.१०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धांसाठी लाईट, साउंड व विद्युत विषय कामे करणे. | १,८९,९०,२१०/- |

एकूण_र.रू.१८९९०२१०/- ( एक कोटी एकोण नव्वद लाख नव्वद हजार दोनशे दहा फक्त जीएसटी सह ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये संबंधीत ठेकेदाराला बील आदा करणेस मान्यता मिळणेस, त्यासाठी त्यांचे समवेत कोणताही करारनामा न करणेस तसेच कोणतीही अनामत रक्कम न घेणेस.

२) वरील देयके बजेट कोड -RE27A185 आणि RE27A113 वर खर्ची_टाकणेस.

३) दि.१०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धासाठी लाईट, साउंड व विद्युत विषय कामे मे.द्वारिका लाईट अँड साऊंड यांचे मार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने करणेस आणि त्यांचे बिल अदा करणेस.

**विषय क्र.११/५१५**

**संदर्भ -** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१६९४,दि.६/२/२०२६ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२५,दि.६/३/२०२६ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०२०,दि.१७/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे नदी पुनरूज्जीवन प्रकल्प अंतर्गत कल्याणीनगर पूल ते मुंढवा पूल ( स्ट्रेच १० व ११ ) लगतच्या ३०.०० मीटर डी.पी.रस्त्याने बाधित खाजगी मिळकत धारकांच्या जागेचे संपादन व हस्तांतरण करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे नियम १२६(२) अन्वये व मुंढवा स.नं.८१(पै), ८१/२६,८२/५,८७/२अ, ८७/२८/१, ८७/२क, ९२/१,९२पै, ९२/११,९२/१३,९२/१३ब व ९३(पै) येथील मंजूर विकास आराखडयानुसार ३०.०० मी.डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्राचे आरक्षित साधारण एकूण २१२८२ चौ.मी.क्षेत्राचे संपादन व हस्तांतरणाची कार्यवाही सुरू करणेसाठी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१२/५१६**

**संदर्भ -** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/१७३५,दि.११/२/२०२६ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२७,दि.६/३/२०२६ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०२१,दि.१७/३/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे पेठ शिवाजीनगर पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारती मधील तळमजल्यावरील उत्तरेकडील PRO ऑफिस शेजारील जिन्याखालील रूम ( गाळा ) १० वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास मुदत वाढ देणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ शिवाजीनगर पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारती मधील तळमजल्यावरील उत्तरेकडील PRO ऑफिस शेजारील जिन्याखालील रूम ( गाळा ) चे क्षेत्रफळ ९.२९ चौ.मी.ही मिळकत १० वर्षे कालावधीसाठी ( महाराष्ट्र महानगरपालिका स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नूतनीकरण ) नियम २०२३ मधील नियम क्र.३(२) अ (iii) (ब) अन्वये भाडेपट्ट्याच्या रकमेत दर तीन वर्षानी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपट्ट्याच्या रकमेत ५ टक्क्यांनी वाढ करून (iii) (अ) नुसार त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रकमेत देखील वाढ करून ) भाडेतत्वावर देणेकरिता सदर गाळ्याचे विद्यमान भाडेकरू पुणे महानगरपालिका निवृत्त सेवक संघ यांना मासिक भाडे र.रू.५९७/- ( अक्षरी पाचशे सत्याण्णव ) अधिक वस्तू व सेवाकर या रकमेप्रमाणे मा.मुख्य सभा मान्यता दिनांकापासून पुढील १० वर्ष कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेकरिता मुदतवाढ देणेस, तसेच नियमानुसार शासकीय कर भरून घेणेस व त्यांचेसोबत नोंदणीकृत करारनामा करणेस.

२) पुणे महानगरपालिका निवृत्त सेवक संघ यांचेकडून र.रू.५०००/- इतकी सुरक्षा अनामत भरून घेणेस.

**विषय क्र.१३/५१७**

**संदर्भ -** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/१६७६,दि.४/२/२०२६ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.८,दि.१६/३/२०२६ चे पत्र.

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगरपालिका सेवाप्रवेश नियमावलीच्या मंजुरीवेळी श्रेणी ४ मधून श्रेणी-३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या

पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या वेळी त्यांच्या पदाच्या असलेल्या श्रेणी-४ प्रमाणे त्यांना सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे प्रमाणे सेवा निवृत्त करणे व तदनुषंगिक लाभ देणेबाबत खालील अ.क्र.१ ते ५ प्रमाणे कार्यवाहीसाठी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) शासन निर्णय क्र.पीएमसी-३०१४ क्र.प्र./०२/नवी-२२,दि.२६/८/२०१४ व शासन निर्णय क्र.पीएमसी-२०२१ क्र.प्र./१०९/नावि-२२,दि.७/६/२०२२ मध्ये नमूद सेवा प्रवेश नियम मंजुरीपूर्वी पुणे महानगरपालिका स्तरावर अस्तित्वात असलेल्या सेवा प्रवेश नियमाप्रमाणे पुणे महानगरपालिका आस्थापनेवर श्रेणी-४ मधील पदांवर ज्या कर्मचाऱ्यांची सरळसेवेने किंवा पदोन्नतीने नियुक्ती झालेली आहे आणि ते कर्मचारी त्याच म्हणजे तत्कालीन श्रेणी-४ च्या पदावर सध्या कार्यरत आहेत अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदाची श्रेणी-४ गृहीत धरून त्यांना पुणे महानगरपालिका सेवाविनियमातील नियम ६६ मधील कनिष्ठ सेवेबाबतच्या तरतुदीनुसार त्यांचे वय वर्षे ६० पूर्ण होतात तेव्हा सेवानिवृत्त करणेची कार्यवाही करणेस.

२) वरीलप्रमाणे तत्कालीन अस्तित्वातील (मुद्दा क्र.१ मध्ये नमूद सेवा प्रवेश नियम मंजुरीपूर्वी ) सेवाप्रवेश नियमानुसार श्रेणी-४ च्या पदावर नियुक्तीस असताना मुद्दा क्र.१ मध्ये नमूद सेवा प्रवेश नियम लागू झाल्याने पदाच्या श्रेणीमध्ये बदल होऊन ज्या कर्मचाऱ्यांना वय वर्ष ५८ झाल्याने सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे आणि आता त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झालेली नाहीत व पुन्हा सेवेत रूजू होण्याची इच्छा व शारीरीक पात्रता आहे ,अशा कर्मचाऱ्यांचे लेखी अर्ज घेऊन व त्यांची शारीरीक पात्रता तपासून त्यांना सेवेत रूजू करून घेऊन वय वर्षे ६० पूर्ण होताच त्यांना सेवेतून सेवानिवृत्त करणेस.

३) ज्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदाची श्रेणी ४ मधून श्रेणी-३ बदल झाल्याने वय वर्षे ५८ नुसार सेवानिवृत्त केलेले आहे आणि आता त्यांचे वय ६० वर्षे पूर्ण झालेले आहे अशा कर्मचाऱ्यांना जणू काही त्या सेवकाने त्याच्या वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यत सेवा केलेली आहे, असे गृहीत धरून त्यांना सेवानिवृत्तीचे वय ६० पूर्ण होईपर्यंत देय होत असलेल्या वेतनवाढी काल्पनिकरित्या मंजूर करणे,अशा वेतनवाढीचा कोणताही प्रत्यक्ष लाभ न देता फक्त सेवा निवृत्ती वेतन निश्चित करणेसाठी अंतिम मूळ वेतन निश्चित करणेकरिता गृहित धरणेस.

४) जे कर्मचारी मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेले मंजूर सेवा प्रवेश नियम लागू झाल्याने श्रेणी-३ मध्ये दर्शविलेल्या पदावर सरळसेवेने किंवा पदोन्नतीने नियुक्त झालेले असतील अशा कर्मचाऱ्यांना त्या पदाची मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाने मंजूर सेवाप्रवेश नियमातील श्रेणी-३ कायम ठेऊन त्याप्रमाणे त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे निश्चित करणे व त्याप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांना त्यांची वय वर्षे ५८ पूर्ण झाल्यानंतर सेवानिवृत्त करणेस.

५) याव्यतिरिक्त भविष्यात ज्या पदांबाबत असा प्रश्न निर्माण होईल त्यापदांबाबत असणारी वस्तूस्थिती तपासून त्यानुसार अंतिम निर्णय मा.महापालिका आयुक्त यांनी करणेस.

**विषय क्र.१४/५१८**

**संदर्भ -** १) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीएमसी-३०१४/प्र.क्र.०२/नवि-२२, दि.२६ ऑगस्ट २०१४

२) पुणे महानगरपालिकेतील आरोग्य सेवकांचा दि.२३/२/२०२३ रोजीचा अर्ज

३) घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील जा.क्र.घकव्यका/७१२३,दि.१३/२/२०२४

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/१८२४,दि.२६/२/२०२६ चे पत्र.

५) मा.हरिदास चरवड व मा.सौ.पूजा जागडे यांची दि.१६/३/२०२६ ची उपसूचना.

६) मा.विधी समिती ठराव क्र.९,दि.१६/३/२०२६ चे पत्र.

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व संदर्भ क्र.५ च्या उपसूचनेनुसार-

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य निरीक्षक,वरीष्ठ आरोग्य निरीक्षक, उप आरोग्य निरीक्षक व प्रमुख आरोग्य निरीक्षक या पदाच्या पुणे महानगरपालिका सेवा ( सेवा व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये दुरूस्ती करणेच्या खालीलप्रमाणे सुधारित प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७(३)(अ) नुसार मे.शासनाची मान्यता मिळणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | प्रचलित तरतूद | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|
| ४४६ | आरोग्य सेवा श्रेणी-२ | प्रमुख आरोग्य निरिक्षक ( मंडई अधिकारी ) मंजूर पदसंख्या-६ | पदोन्नती-१००टक्के पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रमुख आरोग्य निरिक्षक या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव | पदोन्नती-१००टक्के अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी व स्वच्छता निरीक्षक पदविका धारण करणे आवश्यक आहे. आणि ब) पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | असणे आवश्यक. | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठतेच्या आधारे उप आरोग्य निरीक्षक या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |
| ४४७ | आरोग्य सेवा श्रेणी–३ | उप आरोग्य निरिक्षक ( सिलेक्शन ग्रेड सिनिअर सॅनिटर इन्स्पेक्टर) मंजूर पदसंख्या–४ | नामनिर्देशन–५० टक्के<br>अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि स्वच्छता निरिक्षक पदविका<br>ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील उप मुख्य स्वच्छता अधिकारी या संवर्गातील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) शास्त्र शाखेची पद्विधारकास प्राधान्य | पदोन्नती–१०० टक्के<br>अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि स्वच्छता निरिक्षक पदविकाधारण करणे आवश्यक आहे. आणि<br>ब) पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठतेच्या आधारे वरिष्ठ आरोग्य निरीक्षक या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |
| ४४८ | आरोग्य सेवा श्रेणी–३ | वरिष्ठ आरोग्य निरिक्षक (सिनिअर सॅनिटर इन्स्पेक्टर/विभागीय आरोग्य अधिकारी) मंजूर पदसंख्या–४३ | नामनिर्देशन–७५टक्के<br>अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी आणि स्वच्छता निरिक्षक पदविका<br>ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील आरोग्य निरीक्षक/स्वच्छता निरीक्षक या संवर्गातील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) शास्त्र शाखेची पदवीधारकास प्राधान्य<br>पदोन्नती–२५ टक्के<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत आरोग्य निरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | पदोन्नती –१०० टक्के<br>अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी व स्वच्छता निरिक्षक पदविकाधारण करणे आवश्यक आहे. आणि<br>ब) पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठतेच्या आधारे आरोग्य निरीक्षक या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| ४४९ | आरोग्य सेवा श्रेणी–३ | आरोग्य निरीक्षक सॅनिटर इन्स्पेक्टर/वसाहत अधिकारी (गवनि) मंजूर पदसंख्या–२६८ | नामनिर्देशन–५० टक्के<br>अ) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण आणि स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण<br>ब) संबंधित कामाचा किमान | नामनिर्देशन–२५ टक्के<br>अ) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण आणि स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण<br>ब) संबंधित कामाचा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) शास्त्र शाखेची पदवीधारकास प्राधान्य | किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) कोणत्याही शाखेतून मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण |
| | | | पदोन्नती –५० टक्के नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत कर्मचाऱ्यांमधून किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | पदोन्नती –७५ टक्के नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठतेच्या आधारे कार्यरत कर्मचाऱ्यांमधून मंजूर पदावरील किमान ३ वर्षाची सेवा असणे आवश्यक. |

**संदर्भ क्र.५ च्या उपसूचनेनुसार –**

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी–३०१४/प्र.क्र.२/नवि–२२,दि.२६/८/२०१४ अन्वये विहित केलेल्या खालील तक्त्यात नमूद केलेल्या हुद्याच्या सेवानियमामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच सदर बदल करून प्रस्ताव मे.राज्य शासनाकडे मंजूरी करिता पाठविणेस.

| अ.क्र. | पदनाम | प्रचलित तरतूद | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य निरीक्षक सॅनिटर इन्स्पेक्टर–वसाहत अधिकारी (ग.व.नि.) | नामनिर्देशन–५० टक्के<br>अ) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण आणि स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण<br>ब) संबंधित कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) शास्त्र शाखेची पदवीधारकास प्राधान्य | नामनिर्देशन–२५ टक्के<br>अ) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण आणि स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण<br>ब) संबंधित कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) कोणत्याही शाखेतून मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण |
| | | प्रस्तावित पदोन्नती ५० टक्के नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत कर्मचाऱ्यांमधून किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | प्रस्तावित पदोन्नती ७५ टक्के नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठतेच्या आधारे कार्यरत कर्मचाऱ्यांमधून किमान ३ वर्षाची सेवा असणे आवश्यक. |

**<u>विषय क्र.१५/५१९</u>**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१६७४,दि.०३/०२/२०२६ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२४,दि.६/३/२०२६

––––

पुणे पेठ शिवाजीनगर ( भांबुर्डी ) फा.प्लॉट क्र.३३४/अ+ब, सि.स.नं.९५१ येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील, पुनर्वसन इमारतीकरिता अंतिम भोगवटा पूर्णत्वापोटी निर्माण होणार ३०% टीडीआर पुणे महानगरपालिकेकडून माहे जानेवारी २०२६ मध्ये डीआरसी आदा केल्याबाबतची माहित मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे पेठ शिवाजीनगर ( भांबुर्डी )फा.प्लॉट क्र.३३४/अ+ब, सि.स.नं.९५१ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.ओम साई कन्स्ट्रक्शन | रेडीरेकनर नुसार | ९३२३.९३ चौ.मी. ( झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीकरिता अंतिम भोगवटा पूर्णत्वापोटी निर्माण होणार ३०% टीडीआर ) | ००४८०१ | जानेवारी |

**विषय क्र.१६/५२०**

**संदर्भ –** १) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनकडील जा.क्र.टिपीएस-१८२४/६९७/नवि-१३,दि.२६/४/२०२४ रोजीचे पत्र.

२) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनकडील जा.क्र.टीपीएस-१८२४/६९७/नवि-१३,दि.१३/८/२०२४ रोजीचे पत्र.

३) मा.महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.३५९७,दि.७/१०/२०२४ रोजीचे पत्र.

४) मा.महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.३६०७,दि.१०/१०/२०२४ रोजीचे पत्र.

५) शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३,दि.२०/३/२०२५

६) महानगरपालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.मआ/३९९८, दि.२२/५/२०२५ रोजीचे पत्र.

७) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनकडील जा.क्र.टिपीएस-१८२५/७१८/नवि-१३, दि.१६/१०/२०२५ रोजीचे पत्र.

८) पुणे महानगरपालिका शहर सुधारणा समिती ठराव क्र.९३,दि.२०/११/२०२५

९) पुणे महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.२८४,दिनांक २०/११/२०२५

१०) महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.MAHBIL/२०१२/४८४३३,दि.२६/११/२०२५ रोजीचे जाहीर प्रकटन.

११) मुख्य अभियंता, पथ विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.११४६९,दि.२४/१२/२०२५ रोजीचे पत्र.

१२) मा.शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचे दालनातील झालेली सुनावणी दि.२७/१/२०२६

१३) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१७३०,दि.१०/०२/२०२६ चे पत्र.

१४) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२६,दि.६/३/२०२६

----

पुणे पेठ लोहगाव स.नं.२३६ व स.नं.२३८ येथील महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये क्रीडांगण आरक्षण (PG),हॉस्पीटल आरक्षण (H-16), पार्किंग आरक्षण (P-67) पाणी पुरवठा आरक्षण (WW-6), भाजी मार्केट आरक्षण (VM-33), उद्यान आरक्षण(G) या आरक्षणाची आवश्यकता विचारात घेऊन महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३,दि.२०/०३/२०२५ च्या निर्देशान्वये केलेल्या सुनावणी अंती दाखल झालेल्या हरकती व सूचनांचा तपशील मे.महाराष्ट्र शासनास सादर करणेकरिता मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१७/५२१**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१७३६,दि.११/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२८,दि.६/३/२०२६

----

मौजे पुणे हडपसर येथील स.नं.५६/२ ते ५६/७,जुना स.नं.५६/८अ (नवीन स.नं.५६/२/३/४/५/६/७/८ ) येथील ॲमेनिटी स्पेस करीता पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डीआरसी अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पुणे हडपसर येथील स.नं.५६/२ ते५६/७,जुना स.नं.५६/८अ (नवीन स.नं.५६/२/३/४/५/६/७/८ ) | ॲमेनिटी स्पेस | राजेन भारतन, सुरेश भारतन, विजय नरसम्मा अंकम, अर्चना जितेंद्र आगरकर, बनिता ठी. व्ही.आनंद, पुरूषोत्तम नारायण इंगळे, सागर पुरूषोत्तम इंगळे, पांडुरंग कृष्णानी कणसे, अंजली अरविंद काटकर, लता महेश काळाने, श्रीमती टी.कावेरी, श्रीमती विद्या राजीव काशिकर, अनंत लक्ष्मण कुलकर्णी, अरविंद मल्हार कुलकर्णी, नितीन दत्तात्रय कुलकर्णी व इतर ११३ कु.मु.धा.मे.तर्फे भागीदार श्री.राहुल रायचंद कुंकूलोळ व श्री.पंकज चंद्रकांत तुपे. | विरळ वस्ती | २८२०.०० चौ.मी. | २८२०.०० चौ.मी. x २.०५= ५७८१.०० चौ.मी. | ००६४९० | फेब्रुवारी २०२६ |

**<u>विषय क्र.१८/५२२</u>**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१७३७,दि.११/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२९,दि.६/३/२०२६

----

पुणे गुलटेकडी टि.पी.स्किम नं.III, फा.प्लॉट क्र.४३०पै, प्लॉ.क्र.४४ व ४५ ( सि.स.नं.५४४अ/१अ पै ) झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारत A साठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र अदा केले पोटी ३०% टि.डी.आर.पुणे महानगरपालिकेकडून फेब्रुवारी २०२६ मध्ये डीआरसी अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे गुलटेकडी टि.पी. स्किम नं.III, फा. प्लॉट क्र.४३०पै,प्लॉ. क्र.४४ व ४५(सि. | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.बुशरा कन्स्ट्रक्शन | रेडीरेकनर नुसार | ४९९१.९२ चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारत A साठी | ००४८०२ | फेब्रुवारी २०२६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स.नं.५४४अ/१अ पै ) | | | | अंशत: भोगवटा प्रमाणपत्र | | |

**विषय क्र.१९/५२३**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१७३८,दि.११/०२/२०२६ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३०,दि.६/३/२०२६

----

पुणे मंगळवार पेठ,सि.स.नं.२००, फा.प्लॉ.क्र.५ पैकी, सब प्लॉ.क्र.४ येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पुनर्वसन इमारतीचा अभिहस्तांतरणा पोटीचा देय १०% टिडीआर पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डिआरसी अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे मंगळवार पेठ, सि.स.नं.२००,फा.प्लॉ. क्र.५ पैकी, सब प्लॉ. क्र. ४ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. | रेडीरेकनर नुसार | ९३२.३० चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पुनर्वसन इमारतीचा अभिहस्तांतरणा पोटीचा देय १०% टिडीआर) | ००४८०३ | फेब्रुवारी २०२६ |

**विषय क्र.२०/५२४**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१७३९,दि.११/०२/२०२६ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३१,दि.६/३/२०२६

----

पुणे पेठ, घोरपडे, फा.प्लॉट क्र.१६७(पै) (स.नं.५३९/अ/६,अ/१) लोहियानगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पुनर्वसन इमारतीचे अभिहस्तांतरणा पोटीचा १०% टीडीआर अदा करण्यासाठी डीआरसी अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे पेठ, घोरपडे, फा.प्लॉट क्र.१६७(पै) (स.नं.५३९/अ /६,अ/१) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.बुशरा कन्स्ट्रक्शन | रेडीरेकनर नुसार | १३२२.५६ चौ.मी. (पुनर्वसन इमारती साठीअभिहस्तांतरणा पोटीचा १०% टीडीआर | ००४८०६ | फेब्रुवारी २०२६ |

**विषय क्र.२१/५२५**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१८२३,दि.२६/०२/२०२६ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३२,दि.६/३/२०२६

----

पुणे हडपसर स.नं.१११ब/१अ+१ब/१(पै) सि.स.नं.१८१२(पै) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारत A च्या अंशत: भोगवटा प्रमाणपत्रापोटी निर्माण होणारा ३०% टिडीआर पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डिआरसी अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे हडपसर स.नं.१११ब / १अ+१ब/१(पै) सि.स. नं. १८१२(पै) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.एलब्रस रियलटी | रेडीरेकनर नुसार | ८९७.३८ चौ.मी. (इमारत A च्या अंशत: भोगवटा प्रमाणपत्रापोटी | ००४७८९ | फेब्रुवारी २०२६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | निर्माण होणारा ३०% टिडीआर ) | | |

**विषय क्र.२२/५२६**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१८२६,दि.२६/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३३,दि.६/३/२०२६

----

मौजे कोंढवा खुर्द, पुणे येथील सि.स.नं.३९३/४ ( स.नं.४/अ/१ब/१अ, ४/अ१ब/१अ, ४/अ१ब/२, ४अ/१ ४ब/२ ) येथील देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२६ मधील डीआरसी अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोंढवा खुर्द, पुणे येथील सि.स.नं.३९३/४ ( स.नं. ४ / अ/१ब/१अ, ४/अ१ब/ १अ, ४/अ१ब/२, ४अ/१ ४ब/२ ) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.प्रायमार्क डेव्हलपर्स | रेडीरेकनर नुसार | ५४०६.०६ चौ.मी. ( पुनर्वसन इमारती करिता जोते पुर्णत्वापोटीचा २५%टीडीआर फरक व आर.सी.सी. व वीट बांधकाम पुर्णत्वोपोटीचा ३५% टीडीआर.) | ००४८०४ | फेब्रुवारी २०२६ |

**विषय क्र.२३/५२७**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१८२७,दि.२६/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३४,दि.६/३/२०२६

----

पुणे, बावधन ( खुर्द ) स.नं.६/१०/१ येथील ॲमिनिटी स्पेस आरक्षित मिळकतीची पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डी.आर.सी.अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे, बावधन ( खुर्द ) स.नं.६/१०/१ | ॲमिनिटी स्पेस | पॅनासिया हिल्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.तर्फे कु.मु.धा.ब्रम्हाकॉर्प लि.तर्फे अजय रामकुमार आगरवाल | विरळ वस्ती | ६०६.७९ चौ.मी. | ४१२.७९ चौ.मी. x २.०५= | ००६५०३ | फेब्रुवारी २०२३ |

**विषय क्र.२४/५२८**

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१८२८,दि.२६/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३५,दि.६/३/२०२६

----

मौजे पुणे म.कर्वेनगर हिंगणे ( बु ) येथील स.नं.९/१२अ/१३अ(पै) सि.टी.एस.नं.६६६ येथील ३६ मी.डी.पी. रस्त्याने आरक्षित मिळकतीची पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डी.आर.सी.अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पुणे म.कर्वेनगर हिंगणे ( बु ) येथील | ३६ मी. डी.पी. | नंदा भीमराव खांडेकर | विरळ वस्ती | ३००.०० चौ.मी. | ३००.०० चौ.मी. x | ००६५०५ | फेब्रुवारी २०२३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स.नं.९/१२अ/१३अ(पै) सि.टी.एस.नं.६६६ | रस्ता | | | | २.००= ६००.०० चौ.मी. | | |

<u>**विषय क्र.२५/५२९**</u>

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१८२९,दि.२६/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३६,दि.६/३/२०२६

----

पुणे पेठ बावधन ( खुर्द ) स.नं.६/१०/१(पै) येथील ३६ मी.डी.पी.रोडने आरक्षित मिळकतीची पुणे महानगरपालिके कडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डी.आर.सी.अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे पेठ बावधन( खुर्द ) स.नं.६/१०/१(पै) | ३६ मी. डी.पी.रोड | ब्रम्हाकॉर्प लि. तर्फे अजय रामकुमार आगरवाल | विरळ वस्ती | २००७.०० चौ.मी. | २००७.०० चौ.मी. X २.००= ४०१४.०० चौ.मी. | ००६५०९ | फेब्रुवारी २०२६ |

<u>**विषय क्र.२६/५३०**</u>

**संदर्भ –** १) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TDR/१८३०,दि.२६/०२/२०२६ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३७,दि.६/३/२०२६

----

मौजे पुणे हडपसर स.नं.७६,हिस्सा नं.१ ते २३,सि.स.नं.२४८७ ते २५१५ येथील ईडब्ल्यूएस–२७ आणि २४ मी.व ३० मी.डी.पी.रस्त्याने आरक्षित पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये डी.आर.सी.अदा केल्याबाबतची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पुणे हडपसर स.नं. ७६,हिस्सा नं.१ ते २३, सि.स.नं.२४८७ ते २५१५ | ईडब्ल्यूएस–२७ आणि २४ मी.व ३० मी. डी.पी.रस्ता | अ‍ॅल्कॉन तर्फे भागीदार श्री.सचिन जगदीश प्रसाद अगरवाल अ‍ॅल्कॉन तर्फे भागीदार श्री.सचिन जगदीश प्रसाद,श्री.राजेश जगदीशप्रसाद अगरवाल | विरळ वस्ती | ४२५१३.७७ चौ.मी. | ३० मी. डी.पी.रस्ता व २४ मी. डी.पी.रस्ता ८६११.५२ चौ.मी. X २.१= १८५१४.७६ चौ.मी. व ईडब्ल्यूएस–२७ ३३८८४.६५ चौ.मी. X २.१५= ७२८५२.०० चौ.मी.असे एकूण ९१३६६.७६ चौ.मी. पैकी १००००.०० १००००.०० १००००.०० १००००.०० | ००६४९१ ००६४९२ ००६४९३ ००६४९४ ००६४९५ ००६४९६ ००६४९७ ००६४९८ ००६४९९ ००६५०२ | फेब्रुवारी २०२६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १००००.००<br>१००००.००<br>८५२५.०७<br>७०००.००<br>७०००.००<br>८८४१.६९ | | |

**विषय क्र.२७/५३१**

**संदर्भ –** १) मा.पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, पुणे शहर यांचेकडील जा.क्र.पोउपआ/प्रशा/६४४०/२०, दि.११/९/२०२४ रोजीचे पत्र.

२) श्रीमती इंदिरा शेट्टी यांचे दि.२७/२/२०२५ रोजीचे पत्र या कार्यालयाकडील आ.क्र.८०८३,दि.४/३/२०२५

३) मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचेकडील पत्र जा.क्र.अपोआ/पूप्रावि/वाचक/३०९९/२०२५,दि.१८/८/२०२५

४) मा.कलम २०५ रस्ता आखणे समिती यांचेकडील इतिवृत्त जा.क्र.शअजा/१२४७२,दि.२/१२/२०२५

५) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१८३१,दि.२७/२/२०२६ चे पत्र.

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३९,दि.६/३/२०२६

**विषय–** बाणेर म्हाळुंगे रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी मार्ग निर्माण करणेकरिता महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये बाणेर स.नं.१०५(पै),१११(पै) व बालेवाडी स.नं.२५,२६ या मिळकतीमध्ये चक्राकार वाहतूकीसाठी १२.० मी.रूंदीचा रस्ता आखणेबाबत.

----

बाणेर म्हाळुंगे रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी मार्ग निर्माण करणेकरिता महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये बाणेर स.नं.१०५(पै),१११(पै) व बालेवाडी स.नं.२५,२६ या मिळकतीमध्ये चक्राकार वाहतूकीसाठी १२.० मी.रूंदीचा रस्ता आखणेसाठी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२८/५३२**

महाराष्ट्र महानगरपालिका ( नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या ) नियम २०१२ नियम क्र.४ व नियम क्र.५ नुसार ८ (आठ) वैध नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/निवडणूक/२००८,दि.१७/३/२०२६ चे पत्र.

**( टीप – सदर विषय दिनांक १८/३/२०२६ रोजी झालेल्या सभेमध्ये मंजूर झाला आहे.)**

**योगिता भोसले**
**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**